# जिल्हा परिषद,धाराशिव

शिक्षण विभाग (प्राथमिक)

जा.क्र.जिपउ/शिक्षण/आस्था-7/५८३/2024 दि. 06/03/2024

# जाहीर सूचना

**विषय:- शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी-2022 मुलाखतीशिवाय पद निवडीचा विकल्प दिलेल्या संस्थामध्ये पवित्र प्रणाली अंतर्गत शिक्षक भरती निवड यादीतील उमेदवारांना समुपदेशनाने पदस्थापना दिणे बाबत..**

**संदर्भ**:- 1) मा.शिक्षण आयुक्त यांचे पत्र दि.२५/०२/२०२४
२) या कार्यालयाचे पत्र दि. २८/०२/२०२४
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन शासन निर्णय दि.२१ जून २०२३

उपरोक्त संदर्भिय विषयी जाहिर सूचित करण्यात येते की, शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी-2022 मुलाखतीशिवाय पद निवडीचा विकल्प दिलेल्या संस्थामध्ये पवित्र प्रणाली अंतर्गत शिक्षक भरती निवड यादीतील उमेदवारांच्या कागदपत्रांच्या पडताळणी संदर्भ क्र.2 नुसार करण्यात आली आहे. कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित उमेदवारांना संदर्भ क्र.3 मधील शासन निर्णयात नमूद तरतुदीनुसार समुपदेशाने पदस्थापना देण्याबाबत निर्देश आहेत.

करिता कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित उमेदवारंना शासन निर्णय दि.21/06/2023 मधील तरतुदीनुसार शनिवार दि.09 मार्च 2024 रोजी दुपारी 12:00 समुपदेशनाने पदस्थापना देण्यात येणार आहे. यासाठी यादीतील नमूद उमेदवारांनी वेळेपूर्वी यशवंतराव चव्हाण सभागृह ,धाराशिव येथे उपस्थित रहावे. सदर समुपदेशनास गैरहजर राहणाऱ्या उमेदवारांना शासन निर्णयातील तरतुदीनुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव यांच्या स्तरावरून परस्पर पदस्थापना देण्यात येईल याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

**समुपदेशन स्थळ :- यशवंतराव चव्हाण सभागृह,धाराशिव**
**शनिवार दि.०९ मार्च २०२४ वेळ दुपारी १२:०० वा.**

(अशोक पाटील)
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद धाराशिव

**प्रत माहितीस्तव** :- १) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव
२) मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव यांना देऊन विनंती की, दि.०९ मार्च २०२४ रोजी कै.यशवंतराव चव्हाण सभागृह,धाराशिव उपलब्ध करून द्यावे.